# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

## रसायनशास्त्र विभागात नॅनोतंत्रज्ञानावर व्याख्यान संपन्न

अमरावती.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात बंगलोर येथील डॉ. अंतनु भट्टाचार्य यांचे 'नॅनोतंत्रज्ञान' या विषयावर नुकतेच व्याख्यान संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आनंद अस्वार उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना डॉ. अंतनु भट्टाचार्य म्हणाले, नॅनोतंत्रज्ञान वापरुन आपल्याला दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या वस्तू, पदार्थ, यंत्र बनविता येतात. नॅनोतंत्रज्ञानापासून धातु, अधातु, अर्धवाहक, प्लॅस्टीक सारखे मानवनिर्मित पदार्थ नॅनो रुपे बनवली जातात, इतकेच नव्हे तर नॅनो औषधी, नॅनो कापड, नॅनो रंग, नॅनो रॉड, नॅनो जैविक खते, नॅनो पेस्टीसाईड व इनसेक्टीसाईड अशा वेगवेगळ्या गोष्टी बनविण्यास सुरुवात झाली आहे. आज नॅनोतंत्रज्ञानाचा वापर करुन कृषी क्षेत्रामध्ये आमुलाग्र क्रांती घडत आहे, कारण नॅनो पेस्टीसाईड, इनसेक्टीसाईड हे पिकांवर येणाऱ्या विविध रोगांवर गुणकारक औषध ठरले आहे. नॅनोतंत्रज्ञानामुळे अन्न साठवण्याच्या, अन्न टिकविण्याच्या पद्धतीत बरीच सुधारणा झाली आहे.

रसायनशास्त्र हा केंद्रीय विषय असून नॅनोतंत्रज्ञानासाठी अतिशय महत्वाचा आहे, म्हणून विद्यार्थ्यांनी नेहमी विषयासोबत नॅनोतंत्रज्ञान आंतर विद्याशाखीय विषयाचे ज्ञान अद्यावत करणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. पुढे म्हणाले, स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नवीन तंत्रज्ञान नुसते समजून न घेता ते आत्मसात करण्याचा मौलिक सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी पॉवरपॉईंटच्या माध्यमातून नॅनोपदार्थ बनविण्याच्या विविध पद्धतींवर त्यांनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे निराकरण सुद्धा केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. आनंद अस्वार म्हणाले, सध्याचे युग हे स्पर्धेचे असून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्पर्धा आहे. स्पर्धेत आपला विद्यार्थी कसा टिकू शकेल व त्याच्या अंगी असलेले गुण व कौशल्य कसे विकसित करता येईल, यासाठी विभागाद्वारे विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांनी नेहमी काहीतरी नवीन करण्याचा संकल्प करावा व त्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करावा, असा मौलिक संदेश त्यांनी यावेळी दिला.

रसायनशास्त्र अभ्यास मंडळाच्यावतीने शॉल, श्रीफळ देवून डॉ. अंतनु भट्टाचार्य यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक डॉ. मनिषा कोडापे यांनी केले. व्याख्यानासाठी विभागातील डॉ. जागृती बारब्दे, डॉ. चंद्रशेखर लाडोळे, प्रा. अभिषेक ताडे, प्रा. जमिर शेख, कु. पायल टाले, सागर रेवाळे, युसुफ भिमाणी, कु. स्मीता नंद, कु. पायल कडू, शंतनु मावस्कर, कु. अमृता मकेश्वर तसेच विभागतील विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २५/०४/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी